## प्रकरण चौथे

## उपसंहार

## प्रकरण चौथे

## उ प सं हा र

ग्रामीण कथेमध्ये स्त्री कथाकारांची संख्या फारच कमी आहे. त्यांच्या या कथा विशेषांवर फारसा ठसा उमटलेला दिसत नाही. व-हाड प्रांतातील कथा लेखिका प्रतिमा इंगोले मात्र याला सन्मान्य अपवाद आहेत. मराठीतील ग्रामीण कथेला एक पाऊल पुढे नेण्याचे सामर्थ्य प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनात आहे. इतकेच नव्हे तर ग्रामीण कथा परंपरेतील समृध्दता होऊन त्यांची कथा स्वतःच्या खास वाटा शोधताना दिसते. म्हणून त्यांच्या "अकसिदीचे दाणे" (१९८६) "सुगरनचा खोपा" (१९८९), "लेक भुईची" (१९९१) या तीन कथा संग्रहाच्या आधारे इंगोले कथालेखनविशेषाच्या प्रस्तुत प्रबंधिकेत अभ्यास केलेला आहे. हा अभ्यास करताना त्यांच्या कथालेखनाचा आशय अभिव्यक्तीच्या अंगाने प्रामुख्याने विचार येथे केलेला आहे.

प्रस्तुत विषयावरील प्रबंधिकेचा अभ्यास करताना पहिल्या प्रकरणात "ग्रामीण कथेचा स्वरूप आणि विकास" याचा विस्ताराने विचार केलेला आहे. प्रामुख्याने १९२५ पासून ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागली. ग्रामीण साहित्याला प्रेरणा मिळाली, ती गांधीजींच्या नेतृत्वाने. ग्रामीण व नागर साहित्य असा स्पष्ट भेद १९४५ नंतर जाणवू लागला. १९९७ च्या दुष्काळाचे चित्रण करणारी "काळ तर मोठा कठीण आला" ही हरिभाऊंची गोष्ट ग्रामीण कथेची जन्मखूण मानली जाते. मराठी ग्रामीण कथेची सुरुवात वास्तववादातून झाली. १९२६-१९३५ हा काळ कथेला अत्यंत भरभराटीचा, वि.स. सुखठणाकर, लक्ष्मणराव सरदेसाई, ग.ल. ठोकळ यांची कथेत

ग्रामीण वातावरण चितारण्याचा प्रयत्न केला. ठोकळ दिघे यांनी ग्रामीण जीवनातील अज्ञान, रानदांडगेपणा, काव्यात्मता आणि अतिरंजकताही कथेत आणली. पुढे श्री.म. माटे यांनी कथालेखनाचे सांकेतिक बंध झुगारून "अपेक्षितांचे अंतरंग" उलघडून पाहिले. व अपेक्षित जीवन कसे अस्थिर आणि कारुण्यजनक आहे याचा प्रत्यय माटयांनी आपल्या कथांमधून आणून दिला. ग्रामीण जीवनातील साधेपणा रांगडेपणा, जिद्द, श्रद्धा चालीरिती या गोष्टी त्यांनी प्रथम ग्रामीण कथेत आणल्या. म.भा. भोसले यांच्या कथेत ग्रामीण जीवनातील लहान लहान समस्यांची मांडणी व सुशिक्षितांची सामाजिक जाणीव ही वैशिष्ठये आढळतात. पण कथा मांडण्याचे पारंपारिक प्रकारच त्यांनी हाताळल्यासारखे वाटतात. नव्या वाङ्मयीन कलात्मक दृष्टीने ग्रामीण कथा व ग्रामीण व्यक्तिचित्रे लिहिली. ती व्यंकटेश माडगुळकरांनी ग्रामीण जीवनाचा सर्वांगाने कलात्मकतेने दर्शन घडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ग्रामीण समाजातील अन्य घटकांच्या जाणिवेचे तेथील अस्पृश्य जातिल लोकांच्या जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या कथाही माडगुळकरांनी लिहिल्या आहेत. माडगुळकरांच्या नंतर ग्रामीण जीवनातील माणसांच्या मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न शंकर पाटील यांनी केला. ग्रामीण स्त्रियांचे दु:ख व अगतिकपणा कुटुंबातील नात्यागोत्याचे संबंध याचे चित्रण आपल्या कथेतून पाटलांनी केले आहे. द.मा. मिरासदार यांनी ग्रामीण भागातील किस्से, हकिकती, मनोरंजनाच्या दृष्टीने सांगितल्या. दारिद्र्याने गांजलेल्या माणसांच्या संसाराच्या विदारक कथा उद्धव शेळके यांनी लिहिल्या. रा.रं. बोराडे यांची कथा ग्रामीण तशीच प्रादेशिकही आहे. मराठवाड्यातील लोकजीवन चालीरिती, सुखदु:खे बोली यांचे दर्शन त्यांची कथा घडविते. आनंद यादवांनी कथा काव्यमय

केली. आवश्यक तेथे ग्रामीण भाषेतून ते कथा आविष्कृत करतात. ग्रामीण दु:खाच्या चिंतनात्मक विवेचनाचा जाणीवपूर्वक प्रयत्न आनंद यादवांनी आपल्या कथांतून केला. १९६५ नंतरची ग्रामीण कथा ही कलात्मकतेच्या दिशेने वाटचाल करताना दिसते. आनंद यादवांची ग्रामीण कथा ही ग्रामीण कथेच्या वाटचालींचा एक महत्वाचा टप्पा मानावा लागेल.

सखा कलालांनी ग्रामीण जीवनाबरोबरच तेथील दैनंदिन व्यक्तींच्या जीवनातील सुखदु:खाचे प्रसंग आपल्या कथेतून चित्रित केले आहेत. न दिसणाऱ्या सहजपणे जाणवणाऱ्या कित्येक दु:खाची नस कलालांच्या कथेने पकडली आहे. माडगूळकरांच्यानंतर खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील दलितांचे भटक्या विमुक्त जातीचे दर्शन चारूता सागरांनी घडविले आहे.

१९६० मध्ये मराठी साहित्याला दलित साहित्याचा प्रवाह येवून मिळाला. या दलित साहित्याचा उदय होण्यापूर्वी आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात या कथालेखकांनी ग्रामीण भागातील दलितांवरील अन्याय, अत्याचाराचे दु:खाचे चित्रण करणाऱ्या कथा लिहिल्या आणि दलित जीवन हा साहित्याचा विषय होऊ शकतो, हे त्यांनी आपल्या कथांतून दाखवून दिले. जीवनवादी दलित कथेच्या उदयाने १९७० ते ८० च्या दशकात ग्रामीण कथेलाही नवे धुमारे फुटले. बदलते खेडे, त्या खेड्यातील बदलत्या जाणिवा, वर्तमानकालीन खेड्यातील जीवन संस्कृती, परिसर माणसे आणि त्यांची सुखदु:खे चितारणारी आणि बदलत्या खेड्यातील वास्तव जीवनाचा सर्वांगिन वेध घेणारी ग्रामीण कथा उदयाला आली. १९७०-८० या दशकामध्ये ग्रामीण भागात अनेक तऱ्हेने बदलत होत गेला. ग्रामीण भागात नवनवीन बदल

घडून आले. कृषी जीवनाबरोबरच ग्रामीण भागातही यंत्रसंस्कृतीचीही ओळख होऊ लागली आणि ग्रामीण जीवनालाही शहरी जीवनाचे वाढते आकर्षणाही या कथेमध्ये आढळून येऊ लागले. भास्कर चंदनशिव यांच्या घटना या राजकारण, गटबाजी, सरकारी योजनांचा ग्रामीण पातळीवर झालेला परिणाम ते आपल्याकथांत चित्रित करताना दिसतात. महादेव मोरे यांच्या कथेमध्ये खेड्यातील ढासळलेले जीवन, शाळामास्तर, अस्पृश्य दारिद्र्यग्रस्त स्त्रियांची दु:खे ते आपल्या कथांत मांडतात.

बाबाराव मुसळे, सदानंत देशमुख, रंगराव बापू पाटील आदि ग्रामीण कथाकारांनी ग्रामीण कथेचा विकास ग्रामीण जीवनातील प्रश्नांची मांडणी करत आपले हातभार लावले. याच कालखंडाच्या दरम्यान वैदर्भीय ग्रामीण जीवनाचे आणि तिथल्या परिसराचे, माणसांचे त्यांच्या स्वभावाचे, सुख-दु:खाचे समर्थपणे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी केलेले आहे.

दुस-या प्रकरणात प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील आशयसूत्रांचा विचार करण्यापूर्वी आपण लेखिकेचा परिचय व वाङ्मयीन कर्तृत्वाचा आढावा घेतला. त्यांच्या कथेतील जीवनचित्रणामागील जाणीवा लक्षात घेताना लेखिकेने कथांमध्ये जे जीवन चित्रण केलेले आहे त्या जीवनाचा अनुभव आणि प्रगल्भ जाणीव त्यांना आहे. ग्रामीण जीवनातील सूक्ष्म आणि तरल निरीक्षण हेच त्यांच्या कथांचे आशय पाहतांना दिसतात. ग्रामीण जीवनाबरोबरच कृषी जीवनातील ज्या घडामोडी घडतात त्या घडामोडींची परामर्श त्या अलिप्ततेने घेतांना दिसतात. इंगोले यांच्या प्रत्येक कथा विषयाचे वेगळेपण जपणारी व-हाडी लोकजीवन संस्कृती अस्मिता यावर प्रखर प्रकाश टाकणारी दर्जेदार कथा आहे. एकूण कथा आशयावरून विचार करतांना त्यांच्या कथा ह्या अंत:करणाला

भिडणा-या आहेत. मनात घर करुन राहणा-या आहेत.लेखिकेला व-हाडी माणसाबद्दल व परिसराबद्दल असणारी आस्था हा त्यांच्या चित्रण क्षेत्राचा मुख्य धागा दिसतो. त्याचबरोबर अन्य काही वैशिष्ठयामुळे त्यांची कथा वैशिष्ठयपूर्ण ठरते. लेखिकेच्या लेखनात प्रामुख्याने जाणवते ते म्हणजे लेखिकेचे ग्रामीण जीवनाचे संस्कृतीचे, परिसराचे, मानवी भावभावनांचे, मानवी स्वभावाचे, निसर्गाचे सुक्ष्म निरीक्षण, ग्रामीण जीवन आज अंतरंगाने व बहिरंगाने हळू हळू बदलत चालले असले तरी ते एका संक्रमण अवस्थेतून जरी जात असले तरी त्याचे बदलनेही नागरी जीवनापेक्षा वेगळे आहे. त्यामागची कारणे भिन्न आहेत. तेथील अर्थव्यवस्था, ग्रामीण माणसाचे जीवनाचे, परिसराचे या सर्वांचा बारकाईने विचार करुन आणि केवळ स्त्रीवादी भुमिकेतून स्त्री जीवनाचे चित्रण न करता स्त्रीजीवनाचे वास्तववादी चित्रण करतात. स्त्रीच्या वाटयाला येणा-या दुःखाची कारणमीमांसाही त्या करतात. स्त्रीला एकत्रकुटुंबामुळे हुंडापध्दतीमुळे, अंधश्रध्दा परंपरा यामुळे अन्याय अत्याचारांमुळे भोगावे लागलेले दुःख अशी दुःखाची नानाविध रुपे त्या कथातून साकार करतात. कारण स्त्री जीवन हा त्यांच्या चित्रणाचे आस्था केंद्र असलेले दिसून येते. तसेच ग्रामीण तरुणांचा कोंडमारा, ग्रामीण जीवनावर होणारा राजकारणाचा परिणाम आणि मुक्या जनावरावरील प्रेम इत्यादी विषय हाताळलेले दिसून येतात. या साध्या चित्रणातून त्यांची कथा तयार होते. व-हाडी जीवन हा लेखिकेच्या व्यक्तीमत्वाचे एक अविभाज्य अंग असे म्हणाता येईल. तात्पर्य केवळ व-हाडी भाषाच नव्हे तर व-हाडी जीवनाचाही लेखिकेला आत्मा गवसला आहे. हे कथांच्या आशयावरुन जाणवते. सतत पैशाच्या मागे धावणारा जन प्रवाह पाहून खेडयातील माणूस बावरला आहे. जगात वाहणा-या उलटया गंगेबद्दल लेखिकेला दुःख आणि चिंता

आहे. याची जाणीव त्यांच्या कथा आशयातून सतत प्रत्ययास येते. एकूण प्रतिमा इंगोले व-हाड मधील समकालीन ग्रामीण जीवनाचा वास्तव वेध घेणारी कथा ठरते.

तिस-या प्रकरणामध्ये प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील कथानक रचना, व्यक्तिचित्रण, प्रसंगचित्रण आणि भाषाशैली यांचा विचार केलेला आहे. प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील कथानकरचनेचा विचार करताना त्यांच्या कथा या कहाणीवजा अशा स्वरूपाच्या आहेत. काही कथा हया कथेच्या शेवटच्या भागाने कथेला सुरूवात होते. आणि कथानक पुढे सरकत पृ थमसुचीत झालेली घटना घडते. असा त्यांचा कथारचनेचा साचा आहे. वास्तव घटनेचा वेध त्यांच्या कथानक रचनेत आढळतो. इंगोले यांच्या कथांतील व्यक्तिचित्रणही त्यांच्या कथेचा आत्मा आहे. व्यक्ती ही संपूर्ण कथेमध्ये तिच्या सुखदु:खाच्या घटनेतून चित्रित झालेली आहे. व्यक्तिच्या बाहयचित्रणापेक्षा अंतर्मनातील ताणातणावाचा वेध घेते. त्याच्या व्यक्तीचित्रणातील वेगळेपणा म्हणजे स्त्रिच्या दु:खाचा प्रसंग असो की कुटुंबातील ताणातणाव असो तो प्रसंग संयमाने आणि अलिप्तपणे मांडताना दिसतात. सामाजिक समस्या व्यक्तीचा भावविशेष यावर लेखिकेने प्रसंग चित्रण केले आहे. इंगोले यांची प्रसंग चित्रण पद्धत ही वर्णनातून, संवादातून, आत्मनिवेदातून प्रकट झालेले आहे. ग्रामीण भागात घडणारे प्रसंग चोरी, भांडण यासारखे प्रसंग तेवढयाच वास्तवतेने रेखाटले आहेत.

प्रतिमा इंगोले यांचे कथाविश्व आहे ते ग्र ामीण आणि कृषी जीवनाशी अत्यंत एकोप्याचे आहे. त्यामुळे त्यांच्या कथेतील ग्रामपरिसर स्वतंत्र न येता कथेच्या ओघानेच तेथील परिसर हा त्यामध्ये येत जातो. सर्व घटना या ग्रामीण परिसरातच घडतात. त्याचप्रमाणे

कथेतील घटना प्रसंग याचे प्रत्ययकारी चित्रण करणे व कथेतील आटोपशीरपणा, पाल्हाळ कंटाळवाणेपणा भाषणबाजी इत्यादि कथेचा अवगुण त्यांनी जाणीवपूर्वक टाळले आहेत. एवढे करूनही त्यांच्या कथेमध्ये उणिव भासत नाही. भाषाशैली याबाबत त्यांच्या कथांनी वेगळेपणा जाणवून दिला. त्यांची भाषा ही व-हाडी बोलीतील ठसकेदारपणा म्हणी आणि वाक्प्रचार यासह त्या भाषेतील सर्व विशेष बारकाईने त्यांनी आपल्या कथाद्वारे टिपले आहेत.

उपसंहारात प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनाचे जे विशेष आढळलेले ते नोंदविले आहेत. प्रतिमा इंगोले ह्या तशा प्रादेशिक कथालेखिका परंतु आज त्यांची कथा "ग्रामीण कथा" म्हणून ओळखली जाते. कारण तिने प्रादेशिकतेच्या अनुषंगाने ग्रामीण जीवन दर्शन हे महत्वाचे मानले. त्यापुढे त्यांच्या कथेत वाङ्मयीन ग्रामीण जीवनाचे संस्कृतीचे, परिसराचे तेथील माणसांचे, त्यांच्या स्वभावाचे, सुखदु:खाचे आणि व्यक्ती व समाज यांच्या संबंधाचे, व्यक्तीच्या अंतरंगाचे व बहिरंगाचे त्यांच्या अस्मितेचे दर्शन घडविते.

त्याचबरोबर ग्रामीण भागातील स्त्रीच्या जीवनाचे, त्यांच्या सुखदु:खाचे अत्यंत सखोल व सुक्ष्म चित्रण कथांमधून केलेले आहे. कथेच्या आशयविश्वात स्त्रीचे दु:ख हे त्यांच्या कथेतील चित्रण क्षेत्राचे आस्था केंद्र असलेले दिसून येते. स्त्रीचे भावविश्व हे त्यांच्या कथालेखनाचे मोठे वर्तुळ त्या भोवती काढलेले ग्रामीण तरूणाचे शेतक-यांचे राजकारणाचे मुक्या प्राण्यांचे भावविश्व हे छोटे वर्तुळ म्हणावे लागेल. कथा आशयावरून त्यांच्या कथा ह्या अंत:करणाला भिडणा-या व मनात घर करून राहणा-या अशाच आहेत. तसेच इंगोले यांची व-हाडी माणसांबद्दल व परिसरांबद्दल आस्था असलेले दिसून येते. ग्रामीण जीवन

आज अंतरंगाने व बहिरंगाने हळूहळू बदलत चालले असले तरी ते एका संक्रमणावस्थेतून जरी जात असले तरी त्याचे बदलणे ही नागरी जीवनापेक्षा कसे वेगळे आहे त्यामागची असलेली भिन्न कारणे, तेथील अर्थव्यवस्था, ग्रामीण माणसाचे, जीवनाचे, परिसराचे, बदलणे या सर्वांचा सुक्ष्मपणे विचार त्या कथांतून करताना दिसून येतात. ग्रामीण स्त्रियांची नानाविध दुःखे आणि व्यक्ती समाज परिसराचे बदलणे या सर्व गोष्टींची समंजस जाण असलेली व सर्व गोष्टींचा वेध घेणारे लेखिकेचे सजक व प्रगल्भ मन कथेतून प्रत्ययास येते. तसेच सत्ता व पैसा यामागे धावणारा जनप्रवाह पाहून खेड्यातील माणूस बावरला आहे. जगात वाहणाऱ्या उलटया गंगेबद्दल लेखिकेला वाटणारे दुःख आणि चिंता याचेंही प्रत्यंतर त्यांच्या कथेन दिसून येते. हा ही एक त्यांच्या कथा-लेखनाचा विशेष मानावा लागेल. त्यांच्या कथेच्या रचनेमध्ये कधी प्रथम-पुरुषी निवेदन पद्धती तर कधी तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीने पुर्व लक्षी पद्धती वापरल्यामुळे कथा यशस्वी झाल्या आहेत. अशा पात्रानुभवा-वरून अभिव्यक्तीची म्हणजे रचनेची विविधता हे इंगोले यांच्या कथा-तंत्राचे वैशिष्ठ म्हणावे लागेल. त्याचबरोबर प्रत्ययकारी प्रसंग, आटो-पशीरपणा कोणत्याही प्रकारची भाषाबाजी प्रचारता असे काही आढळत नाही. इंगोले यांनी कथेमध्ये वापरलेली खास वऱ्हाडी बोली, वऱ्हाडी बोलीतील छोटी छोटी अर्थगर्भवाक्ये, म्हणी, वाक्प्रचार योग्य चुकता यातून वर्णनातील, प्रसंगातील, व्यक्ती चित्रणातील अचूकपणा वास्तवतेने उभारतात. ग्रांथीक भाषेचा व्याकरणीक भाषेचा वापर त्यांनी टाळलेला आहे. कथानकातील भूभाग, प्रादेशिक शब्द व प्रतिमा ह्या साऱ्या वऱ्हाडी प्रदेशातील जाणवतात. त्यांच्या कथेतून येणारे जीवनचित्रण, व्यक्तीचित्रण प्रसंगवर्णन यांचे प्रत्ययकारी वर्णन करतात. बोलीभाषेतील रचना, शब्द व

प्रतिमा यांचा वापर करून संवाद व निवेदन त्या त्या व्यक्तींच्या समाजाच्या शब्दातून करतात. कथेचा प्रारंभ, मध्य, शेवट अपेक्षित असाच असतो. या सर्व बाबींमुळे इंगोले यांची कथा हृदयस्पर्शी ठरते.

प्रतिमा इंगोले या स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्वाच्या ग्रामीण कथालेखिका आहेत. ग्रामीण कथेमध्ये स्त्रीलेखिकेचा अभाव आढळतो. त्याला प्रतिमा इंगोले ह्या सन्मान्य अपवाद आहेत ग्रामीण जीवनाचे, संस्कृतीचे, परिसराचे माणसाचे, त्यांच्या सुखदुःखाचे चित्रण त्या प्रभावीपणे करू शकतात. कारण हे ग्रामीण जीवन, संस्कृती, परिसर, माणसे त्यांची अस्मिता व सुखदुःखे ही लेखिकेने प्रत्यक्षात अनुभवलेली आहेत. त्यात स्त्रिया, शेतकरी, शेतमजूर, तरूण, सुष्ठ-दृष्ठ माणसे, राजकारण, मुकी जनावरे असे विविध घटक त्यांच्या कथाविश्वात सहजपणे अंतर्मुख होताना दिसतात. या साऱ्याचे प्रतिमा इंगोले यांनी अत्यंत बारकाईने, सुक्ष्मपणे निरीक्षण करून त्यांच्या जीवनातील कारुण्य व नाट्य यांचा वास्तव सहानुभूतीच्या भूमिकेतून कथेतून चित्रीत करतात. केवळ स्त्रीवादी भुमिका न ठेवता व्यापक भूमिकेतून ग्रामीण जीवनातील वास्तवतेचा वेध घेणाऱ्या कथा त्यांनी लिहिलेल्या आहेत. म्हणून ग्रामीण कथेच्या क्षेत्रात स्त्री लेखिका म्हणून प्रतिमा इंगोले यांचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण आहे.

.....

## संदर्भ सुची


१) इंगोले प्रतिमा - अकसिंदीचे दाने
मराठवाडा पब्लिशिंग हाऊस,
औरंगाबाद प्रथमावृत्ती - १९८६

२) इंगोले प्रतिमा - फुफाट्याचा खोपा
साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, जुलै १९८९

३) इंगोले प्रतिमा - लेक भुईची
वसुधा प्रकाशन, नाशिक
प्रथमावृत्ती फेब्रुवारी १९९१

४) कानडजे एस.एम. - आनंद यादव : साहित्य आणि जीवन
स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे ८
प्रथमावृत्ती मार्च १९८५

५) कुंभार प्रकाश - दलित कथासाहित्य
प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती ऑगस्ट १९९१

६) कोत्तापल्ले नागनाथ - साहित्याचा अन्वयार्थ
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०
प्रथमावृत्ती सप्टेंबर १९९६

७) कोत्तापल्ले नागनाथ - ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे -३०
प्रथमावृत्ती जानेवारी १९८५

८) चवरे रा.गो. - मराठी कथाप्रवृत्ती आणि प्रवाह
मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती.
प्रथमावृत्ती ऑक्टोबर १९९५

९) ठाकूर रविंद्र - आनंद यादव : व्यक्ति आणि वाङ्‌मय
मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे - ३०
प्रथमावृत्ती जुलै १९९३

१०) मुलाटे वासुदेव - ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास
साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमाआवृत्ती, जानेवारी १९९२

११) यादव आनंद - ग्रामीण साहित्य, स्वरूप आणि समस्या
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०
वृत्तीआवृत्ती १९९३

१२) यादव आनंद - मराठी साहित्य समाज आणि संस्कृती
मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे ३०
प्रथमाआवृत्ती ऑगस्ट १९८५

१३) सोमण अंजली - मराठी कथची स्थितीगती
प्रतिमा प्रकाशन, पुणे - ३०
प्रथमावृत्ती - १९९५

१४) हातकणंगलेकर म.द. - मराठी कथा रूप आणि परिसर
सुपर्ण प्रकाशन, पुणे - ३०
प्रथमावृत्ती मार्च - १९८६

वृत्तपत्रे

१५) दैनिक देशोन्नती-नागपूर - रविवार दि. २४ मे १९९८
"गाठीभेटी" या सदराखाली
हिम्मत शेकोकार, यांनी प्रतिमा इंगोले यांची घेतलेली मुलाखत

१६) जागर लोकपत्र विदर्भ - दि. १०/१/१९९३.


.....